श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ९ अंक ६ ] भाद्रपद [ शके १८५४

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.

अनुभव ... ... ... ... ... १-५
साई चिंतामणीचा जन्म
व कै. डॉ. प्रभाकर भांडारकर ... ... ६
अनुभव ... ... ... ... ... ७-१०
मनमाड स्टेशनवरील श्रीबाबांचे भक्त पर्वतबुवा हमाल ११-१४
पिशाच्च योनी व त्यावर सुचलेले विचार ... १५-२०
शिर्डीसंस्थानच्या भक्तमंडळाची वार्षिक सभा ... २१-२२
श्री साईबाबांचा पुण्यतिथिउत्सव ... ... २३-२६
श्री संतकथामृत अध्याय ४-५ ... ... २७-३२

---

## विनंति.

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २-८-०.

**रा. आ. तर्खड.**
व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

---

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजाबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,
—प्रकाशक.

# अनुभव

श्रीगुरुवर्य बाबांबद्दल मला फक्त १९१६ मध्यें माझ्या मातु:श्री ती. गं. अन्नपूर्णाबाई दर्शन घेण्यास गेल्या होत्या, त्यावेळीं प्रथम माहिती मिळाली. माझी भावजय राधाबाई यवतमाळ येथें नुकतीच वारली होती व त्याबाबत आमच्याकडे पत्र आलें नव्हतें. बाबा मातु:श्रीस म्हणाले, 'वर देऊं नको' त्या वेळीं मातु:श्रीस त्याचा कांहीं अर्थ समजला नाहीं. परंतु घरीं परत आल्यावर जेव्हां भावजय वारल्याचें पत्र पोंचलें तेव्हां आम्हांस बाबांच्या म्हणण्याचा अर्थ समजला; परंतु माझ्या दुर्दैवानें मला बाबांचें दर्शन घडलें नाहीं, याबद्दल आतां मात्र वाईट वाटतें.

त्यानंतर आजपर्यंत जवळ जवळ १६ वर्षांत बाबांबद्दल आठवणसुद्धा झाली नाहीं. परंतु ता. ८-३-१९३२ पासून कांहीं मोठया प्रापंचिक संकटांत पडल्यामुळें व कोणाही मानवी उपयाची मदत न मिळाल्यामुळें ईश्वराशिवाय मला कोणीही तारणें शक्य नाहीं अशी मनाची खात्री झाल्यामुळें मीं "गुरुगीता नांवाची पोथी वाचण्यास अरंभ केला. उद्देश एवढाच कीं, कोणीतरी सद्गुरु भेटून माझ्या प्रापंचिक व मानसिक व्यथा दूर होतील; जवळ जवळ १॥ महिना सारखी एकचित्तानें श्रीदत्तात्रेयाची उपासना चालविली; नंतर एके गुरुवारीं रात्रीं ८॥ च्या सुमारास गांवाबाहेरील दत्तमंदिरांत दर्शनास जाण्याकरितां निघालों. रस्त्यानें जातांना मनांत सारखे विचार येत कीं, 'देवळांत जाऊन काय उपयोग? रोजच जातों, पण कांहीं चमत्कार पाहावयास मिळत नाहीं, व आतां काय करावें हें समजत नाहीं;' म्हणून बराच वेळ मैदानांत बसून राहिलों, व निश्चय केला कीं, आज दत्तमंदिरांत न जातां मनांत दत्तमूर्तीची कल्पना करून घरीं जावयाचें. परत येतांना मंदिरांत आरती चालली होती मन पुन्हां फिरलें व दर्शनाकरितां आंत शिरलों. तों चमत्कार असा कीं, अगदीं जवळ जईपर्यंत नेहमींप्रमाणें दत्ताची मूर्ति न दिसतां कांहींतरी समाधीसारखें व वर डौलदार नक्षी केली आहे असें दिसलें व हा प्रकार काय असावा याबद्दल मनास तळमळ लागली. रात्रीं घरीं आल्यावर व दुसरे दिवशीं सकाळीं हा प्रकार काय असावा हा विचार

करीत वेळ घालविला; दुपारीं नेहमींप्रमाणें दत्तचिंतन करीत झोंप येण्याचा प्रयत्न केला; पण झोंप येईना; म्हणून घराबाहेर कपडे करून पडलों व कोठेंतरीं गांवाबाहेर जावें म्हणून निघालों. दुपारीं १ च्या सुमारे असल्यामुळें गांवाबाहेर येतांच तहान लागली म्हणून गोखले नांवाचे एक रिटायर्ड मामलेदार गांवाच्याबाहेर प्लेगमुळें राहाण्यास गेले होते त्यांच्या येथें पाणी पिण्यास गेलों. पाणी पिऊन तेथेंच जवळ असलेलें मोठें पुस्तक कसलें आहे म्हणून त्यांस विचारलें. ते म्हणाले, "साईसच्चरित." मी पुस्तक कधींहीं पाहिलें नसल्यामुळें नुसतें मध्यंतरीं उघडलें व पाहातों तों जें चित्र दिसलें तें आदले दिवशीं दत्तमंदिरांत पाहिलेलें दृश्य हुबेहूब तेंच अशी मनाची खात्री झाली त्यामुळें अशा अकल्पित रीतीनें कालच्या चमत्काराचा उलगडा झालेला पाहून माझ्या मनास अत्यंत अवर्णनीय आनंद झाला श्री. गोखले यांच्याकडून बाबांविषयीं सर्व माहिती समजावून घेतली व सायंकाळीं ५ वाजेपर्यंत तेथेंच बसलों व तेवढ्या वेळांत त्या पुस्तकांतील कांहीं गोड वाटले तेवढे अध्याय वाचले. वाचतां वाचतां येथील बाळासाहेब देव हे जेव्हां डहाणूस मामलेदार होते त्या वेळीं बाबा व कै. बापूसाहेब जोग व कै. काकासाहेब दीक्षीत यांच्याकडे तीन संन्याशांच्या रूपानें त्यांच्या मातुःश्रीच्या व्रतोद्यापनाच्या दिवशीं त्यांच्याकडे भोजनास आले होते. या तीन संन्याशांपैकीं एक सन्याशी व्रतोद्यापनापूर्वीं एक महिना अगोदर श्री. देव यांच्याकडे गोरक्षणाकरितां मदत मिळविण्याच्या निमित्तानें गेले होते तें वाचलें व मनांत स्फूर्ति झाली कीं बाळासाहेब केव्हां भेटतील व मी मन मोकळें करून सर्व हकीकत त्यांना केव्हां सांगेन. विशेष चमत्कार असा वाटला कीं आजपर्यंत भक्तिलीलामृत यांत ज्या कथा वाचल्या तसाच प्रत्यक्ष चमत्कार ज्यांच्या घरीं सद्गुरूनीं दाखविला त्यांची लवकर ओळख करून घेण्याचा मनास ध्यास लागला व म्हणून श्री. गोखले यांच्याजवळ त्यांच्याबद्दल चौकशी केली. चौकशीअंतीं असें समजलें कीं, ते रामनवमीकरितां बाबांच्या येथें गेलेले असून आणखी ५–६ दिवसांनीं येतील. आतां हे ५–६ दिवस कसे काढावे हा मनाशीं विचार केला व रात्रीं झोंपी गेलों. पहांटे

असा एक दृष्टान्त झाला कीं, बाळासाहेब हे येथेंच आहेत; म्हणून सकाळीं उठून त्यांच्याकडे गेलों व त्यांच्या घरीं चौकशी केल्यावर बाहेरील त्यांच्या येथील एका मुलानें सांगितलें कीं, ते काल रात्रीं शिरडीहून येथें आले. हें ऐकून मी त्या मुलांकडे आश्चर्यानें पाहिलें व मला त्यांना भेटावयाचें आहे म्हणून सांगितलें. १० मिनिटांनीं बाळासाहेब बाहेर आले व त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून त्यांस सर्व हकीकत सांगितली, व त्यानीं बाबांच्या हातची उदी व फोटो आणि प्रसाद दिला व मी घरीं परत आलों.

दुसऱ्या दिवशीं पहांटे दृष्टांत झाला कीं, मी खुद्द कोपरगांव स्टेशनवर आहें व तिघेजण त्यांच्या तोंडावर कोड आल्यामुळें बाबांचा ठिकाणा विचारीत आहेत. इतक्यांत बाबा समोरून येत आहेत, असें दिसलें व मीं त्यांना रस्त्यांत साष्टांग नमस्कार घातला. बाबानीं मला चांगली एक पक्का शेर गुळाची पुडी दिली व मी ती बरणींत ठेविली. तीमधील गूळ मला काढतां येईना. ४-५ दिवसांनीं मी पुनः बाळासाहेबांच्या येथें गेलों व माझी शिरडीस जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांनीं लगेच तेथील इसमाला पत्र लिहून दिलें व त्याप्रमाणें त्यांनीं मला सांगितलें कीं, 'तुम्हीं संकटांतून मुक्त होऊन १ जूननंतर कामावर रुजू व्हाल.' खरोखरच मी ४ जून रोजीं संकटांतून मुक्त होऊन कामावर रुजूं झालों व बाळासाहेबांच्या मुखांतून जणूं कांहीं साक्षात् बाबाच बोलले याबद्दल सत्यता पटली.

मी मात्र शिरडीस गेलों नाहीं; कारण तेथें जाऊन मला उपदेश कोण करणार ? बाबा असते तर ठीक व ते तर नाहींत, म्हणून ८-१० दिवस त्यांच्या चिंतनांत घालविले. नंतर एके दिवशीं पहांटे सद्गुरु नारायणमहाराज स्वप्नांत दिसले. त्यांना साष्टांग नमस्कार केला व म्हणूनच २-४ दिवसांनीं केडगांवास गेलों. पहिल्याच दिवशीं तेथें रात्रौ झोंपीं गेलों तेव्हां पहांटे श्रीसद्गुरूनीं स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, 'मी व बाबा दोन नाहीं. बाबांच्याकडे कां गेला नाहींस ?' मी सांगितलें कीं, 'माझ्या अज्ञ बुद्धीला तेथें प्रत्यक्ष मला उपदेश करणारे कोणी नाहींत, असें वाटलें म्हणून गेलों नाहीं. असो. नंतर मात्र बाबांबद्दल मनांत फारच भक्ति बसली व बाबांच्या अघटित लीलेची जणींव झाली.

खेमाची गल्ली, ठाणें, ११-८-३२. बाबांचा चरणरज.

# अनुभव

आमचा मुलगा चि. साईचिंतामणी यांची गेल्या चैत्र अखेरीस प्रकृति बरीच बिघडली होती; त्यामुळें आम्हीं अतिशयच भ्यालों होतों. मुलगा लहान असल्यामुळें व्यथा सोसण्यास त्यास फार कष्ट होत असत. त्या भीतीमुळें मी साईबाबास प्रार्थना केली कीं, "डॉक्टरनें जर आज सांगितलें कीं, ह्या मुलाला आतां मुंबईत "कन्सल्टिंग रूम"मध्यें आणावयाची गरज नाहीं, तर मी मुलाला येत्या "गुरुपौर्णिमेस" तुमच्या दर्शनास पाठवीन." त्याप्रमाणें डॉक्टरकडे गेल्यावर त्यानें मुलास नेहमींप्रमाणें तपासून 'त्याच्या दुखापतीस आतां तपासण्याची गरज नाहीं व फक्त मलम देईन तें लावीत जा, व आठ दिवसांनीं त्यास दाखवावयास पाठवा,' असें सांगितलें. त्याप्रमाणें दोन दिवसांत त्याला गुण आला, व आठव्या दिवशीं मुलगा साफ बरा झाला, व मलमही लावण्याची गरज नाहीं, असें डॉक्टरनें सांगितलें. "श्रीसाईमाऊलीनें" माझ्या मनाप्रमाणें तर घडवून आणले व "गुरुपौर्णिमा"ही आली. उद्यां शिरडीस इतर मंडळी जाणार. तर त्या मुलास दोन दिवसांपूर्वींच फारच पडसें झालें व पाऊसही फार पडत होता. शिर्डीस जावयाचे आहे, व जास्त पडसें होऊं नये म्हणून दोन दिवस त्याला शाळेंतही जाऊ दिलें नाहीं; पण साईमाऊली माझी परीक्षा पाहात होती! उद्यां जावयाचें तर आधल्या दिवशीं मुलास ताप भरला. डॉक्टरनें औषध दिलें व त्याला 'एक्सपोज' करूं नका अशी ताकीद दिली. आतां करावें काय? मुलगा तर सारी रात्र कण्हत राहून मधून मधून झोंपेंतून ओरडत असे. मी विचारले कीं, तो जागा झाल्याबरोबर म्हणत असे कीं 'माझ्या सर्वांगाला तुम्हीं हात लावून पहा; घाम सुटतो; तूं उगीच भिवूं नको. बाबा मला दर्शन देतील.' अशी सारी रात्र काढून एकदाचें उजाडलें. त्याच दिवशीं 'शिर्डीस' जावयाचें म्हणून तो फारच हुषारी दाखवीत आहे, असें मीं जाणलें. मी त्याला म्हणालें, 'अशी ओढाताणीची हुशारी कां दाखवितोस? बाबांना तुला दर्शन द्यावयाचें असेल, तेव्हां देतील.' तो म्हणाला, 'आई, तुझी

साईबाबांवर खरी भक्ति असली तर मला आज पाठविशील; मी घरांत आहे तोंपर्यंत बाबा तुझें सत्त्व पाहात आहेत. एकदा मी ट्रेनमध्यें बसलों कीं, बाबा माझा सर्व ताप व पडसें घालवितील.' त्याप्रमाणें तो स्टेशनवर गेल्याबरोबर त्याला आरामच पडत चालला व तो हुशारच झाला. त्या दिवशीं फारच पाऊस पडत होता. मनमाडास व कोपरगांवीं तसाच पाऊस होता व नाव चालू होती. भिजून चांगल्या माणसांसही पडसें होणार; पण ह्या तापाच्या मुलास कांहीं झालें नाहीं व बरोबर नेलेलें औषध परत आलें. मी घरांत बिनफिकीर राहावें म्हणून बाबांनीं असा योग आणिला होता कीं, शिर्डीस सोबत जाण्याच्या मंडळींत मुलांची धाकटी आत्याबाई त्यांची काळजी घेण्यास होती व त्याप्रमाणें आत्या-बाईच्या नजरेखालीं शिर्डीची यात्रा आनंदांत करून मुलगा ७ त्या दिवशीं सुखरूप घरीं आला. निःस्सीम श्रद्धा, मग ती अज्ञान बालकाची असो, अगर सुज्ञ वृद्धाची असो, बाबा फलद्रूप तात्काल कसे करतात, हें वाचकांनी पाहावें.

" अगाध लीला बाबांची "

साई-प्रधानबाग,
साईबाबा लेन,
सान्ताक्रुझ,
ता. २०८, १९३२.

सौ. छोटूबाई मोरेश्वर प्रधान.

# " साईचिंतामणीचा जन्म "

चाल:—चंद्रकांत राजाची कन्या.

अघटित घडवी लीला साई नकळे तुझी कल्पना ॥
मानवा न तूं जाणवी ऐसी प्रकारची नाना ॥ १ ॥
केलें सार्थक मम जन्माचें दिला बाघु पुन्हा ॥
म्हणुनी येणें अमुचें झालें साई दर्शना ॥ २ ॥
अशीच ठेवीं कृपा दृष्टी साईबालकावरी ॥
ठेवि कृपेचें सदोदीत तूं छत्र त्याजवरी ॥ ३ ॥
बारस केले बहु श्रद्धेने साई चरणाशीं ॥
नांव ठेविलें " साईचिंतामणि " तुझ्या कल्पनेशीं ॥ ४ ॥
दिर्घायु करो साई त्याला प्रार्थितसें तुजला ॥
ज्ञानामृत पाजुन साई सुखी ठेवि त्याला ॥ ५ ॥

सान्ताक्रुझ, साई प्रधानबाग, नोव्हेंबर, सन १९२४. } लीलावती गजानन कोठारे.

---

# कै. डॉ. प्रभाकर भांडारकर

गेल्या श्रावण महिन्याच्या अंकांतल्या एका लेखांत वरील प्रेमळ मित्राचें नांव आलें आहे; त्यांच्यासंबंधानें विशेष उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं.

हे गृहस्थ त्यांच्या तरुणपणीं अत्यंत सालस व निगर्वी होते, जो स्वभाव त्यांच्या उत्तर वयांत मोठ मोठया हुद्यांवर असूनही विशेष प्रमाणांत दिसून आला होता.

आपल्या परमपूज्य पित्याचें अनुकरण करून, श्रीतुकाराममहाराजांच्या अभंगाचें भक्तिपूर्वक अध्ययन व परिशीलन करून त्यांनीं स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधले.

प्रार्थनासमाजाचे ते एक प्रफुल्ल रत्न होते.

रा. आ. तर्खड,
संपादक.

# अनुभव

काहीं कामानिमित्त लेखक व एक स्नेही आज सायंकाळीं श्री. शामराव रामचंद्र विनायक जयकर यांच्या भेटीला श्रीतिळक–मंदीर–रोड, पार्लें येथें त्यांच्या घरीं गेले होते.

श्री. शामरावजी हे एक अत्यंत प्रेमळ व भाविक असे श्रीसाई-माउलीच्या बाळगोपाळांपैकीं आहेत.

हे गृहस्थ एक अप्रतिम प्रसिद्ध आर्टिस्ट आहेत. श्रीद्वारकामाईंतलें श्रींचें रम्य तैलचित्र यांच्याच हातून रंगविलेलें आहे. तसेंच रा. ब. मोरेश्वरराव प्रधन यांच्या घरीं त्यांच्या बैठकीच्या व देवघरांतल्या खोलींतलीं तैलचित्रें यांच्याच हातून रंगविलेलीं आहेत.

श्रींच्या पायांपाशीं हे गृहस्थ सतत दोन वर्षे राहिले होते. स्वतः एक पहिल्या प्रतीचे चित्रकार, सबब सूक्ष्म अवलोकन करण्याचें साधन त्यांनीं बाळपणापासून नैसर्गिकरीत्या साध्य केल्यामुळें श्रींच्या हालचालींवर, उठण्या-बसण्यावर, इतर जनांबरोबर वागण्याची रीतभात व तऱ्हा त्यांच्या (जयकरांच्या) मानसपटलावर इतक्या उत्तम प्रकारें ठसल्या आहेत कीं, त्यांचीं तैलचित्रें पाहत असतांना दृष्टि खिळून राहते.

श्रींच्या चर्येवर आपल्या बाळगोपाळांच्या ठिकाणीं वेळोवेळीं दिसून येणारें **प्रेम व उत्साहपूर्वक स्मित** हें श्री. जयकरांनीं आपल्या कृतींत इतकें उत्तम प्रकारें उतरविलें आहे कीं, त्या तैलचित्रांचीं छायाचित्रेंही त्यांची साक्ष पटवितात, आणखी दुसरा पुरावा कशाला ?

श्रींच्या लीलांविषयीं बोलतांना श्री. जयकरांचे व ऐकणारांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येतात. त्यांनीं श्रींचे अनुभव लिहून पाठविण्याचें कबूल केलें आहे. हे अनुभव श्रींच्याच लीलेमध्यें आनंदानें प्रसिद्ध होतील.

श्रावण महिन्याच्या अंकाच्या पान ४ वरून त्यांच्या स्वतःच्या साधारण त्याच प्रकारच्या अनुभवांची आठवण होऊन त्यांनीं आज सांगितलेली गोष्ट त्यांच्याच शब्दांत देण्यांत येत आहे:—

" आम्ही शिरडीस असतांना मुंबईचे रा. वर्दे यांच्या मनांत श्रीचरणीं एक सत्यनारायण करावा असें आलें; त्याप्रमाणें त्यांनीं आपला मनोदय श्रीसाईबाबांना कळवला. बाबा म्हणाले, "अरे मला सत्यनारायण वगैरे कांहीं नकोत, उगाच कां खटपटींत पडतोस ? "

वर्दे म्हणाले, " माझा नवस आहे बाबा ! आपण सर्व जाणत आहांच, इतका मज गरीबावर अनुग्रह कराना ? "

हो, ना; हो, ना; होतां होतां श्रीसाईबाबा एकदांचे कबूल झाले, आणि श्री. वर्दे पूजेच्या सामुग्रीच्या तयारीला लागले.

पूजेसाठीं सर्व जिनसांची व्यवस्था लावतांना श्री. वर्दे यांची पुंजी संपुष्टांत आली, आणि प्रसादाच्या सामानासाठीं रुपये अडीचची खूट पडली. ते श्रींकडे गेले आणि, " प्रसादाप्रीत्यर्थ अडीच रुपये कमती पडतात बाबा ! काय करूं ? " अशी त्यांनीं श्रींजवळ पृच्छा केली. त्या वेळीं बरीच जाडी जाडी मंडळी श्रींच्याजवळ श्रीद्वारकामाईंत बसली होती. मी बाहेरच्या ओंवरींत दूर बसलों होतों. तेव्हां माझ्याकडे बोट दाखवून श्री म्हणाले, " जा ! त्या भाऊपाशीं अडीच रुपये आहेत ते मागून घे. "

त्या वेळीं माझ्या खिशांत अवघे अडीच रुपयेच होते, जे मला एकट्यालाच माहीत होते. मुंबईहून दुसरे पैसे येण्याला बराच अवकाश होता, म्हणून त्या परक्या ठिकाणीं जपून खर्च करण्यासाठीं ते अडीच रुपये मी अत्यंत काळजीपूर्वक स्वतःजवळ ठेवले होते.

श्री. वर्दे माझ्याजवळ आले आणि अडीच रुपयांची त्यांनीं मागणी करतांच मीं ते रुपये त्यांना दिले.

पुढें जेव्हां का केळीचे चार खांब आणतांना श्रींनी पाहिलें तेव्हां, " हे रे कशाला ?" म्हणून त्यांनीं विचारलें. तेव्हां श्री. वर्दे म्हणाले,

" यांचा तर मांडव आपल्याभोंवती रचावयाचा आहे. "

" मला मांडव विंडव कांहीं नको, " बाबा रागानें म्हणाले.

" बाबा ! असंही काय करतां ! मज गरीबाचा नवस फेडूं द्या ना ?"

बाबा कबूल करीनात ! वर्दे रडकुंडीस आले. कांहीं वेळ आग्रहानंतर बाबा एकदांचे कबूल झाले ! मग काय सांगतां ! सर्व मंडळी एकवटून उत्साहानें हां हां म्हणतां असा एक मांडव श्रींच्याभोंवती रचला कीं काय सांगू ! त्या वेळेची आठवण झाली आणि तो देखावा डोळ्यांपुढें आला म्हणजे, बाबासाहेब ! आनंदाचें भरतें येतें. धन्य या गरिबाचे डोळे कीं तो सोहळा त्यांना पाहावयास मिळाला !

असो. पुढें पोथीला आरंभ झाला. पोथीचें वाचन सभामंडपांत खालीं सुरू झालें. त्या वेळीं मी इतर मंडळीबरोबर वर श्रीद्वारकामाईंत श्रींची चरणसेवा करीत बसलों होतें.

इतक्यांत मनांत विचार आला. 'अरे ! पोथीवाचन चाललें असतां रियाजाप्रमाणें पोथीजवळ बसलें पाहिजे नव्हे ?' पुन्हां वाटलें, 'अरे, आपण श्रींची चरणसेवा करीत आहोंत ना ?' पुन्हां मनाचें आंदोलन झालें कीं पोथीकथन चाललें असतां पोथी ऐकण्याचा रिवाज ?

हें सर्व बोलावयाला आणि लिहावयाला कितीतरी वेळ लागतो, पण मनरूपि चंचल माकडानें एका निमिषार्धांत वरील सर्व खेळ केला ! झालें ! बाबा मला म्हणाले, " उठ ! खालीं जा ! आणि पोथीजवळ बस ! "

दुसऱ्या कुणालाही याप्रमाणें न बोलतां, मलाच असा विशिष्ट प्रकारचा हुकुम केलेला पाहून इतर मंडळीला आश्चर्य वाटलें; पण मला श्रींच्या अंतर्साक्षित्वाचा वेळोवेळीं अनुभव आल्यामुळें, माझे डोळे पाण्यानें भरून आले, आणि पायऱ्या उतरून खालीं सभामंडपांत मी पोथी ऐकत बसलों !

" बाबासाहेब ! तुम्हांला श्रींच्या लीला काय काय सांगू तरी ! ! "

" कोण जाणें ! या लीला तुमच्या तोंडून ऐकण्यास मिळाल्या, व आप त्या लिहून श्रींच्या इतर बाळगोपाळांस कळवून सर्वांस कृतार्थ कराल या हेतूनें श्रीसाईमाउलीनें आजचा योगायोग बुद्धया कशावरून घडवून आणला नसेल श्रींच्या सर्वच लीला अगाध, अगम्य व अनाकलनीय अशा अशा आहेत. असें म्हणून व श्री. शामरावजींचें आपण " आपले अनुभव जरूर लिहून पाठवून देईन. " असें आश्वासन घेऊन आम्हीं दोघेजण घरीं परतण्यासाठीं निघालों

श्रीगोकुळाष्टमी,
बांद्रें, ता. २४ ऑगस्ट १९३२. } रा. आ. तर्खड, संपादक.

---

## श्री सभामंडप खातें

वर्गणी हस्तें श्री. दासगणू महाराज

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| १९३२ | | |
| आगस्ट २७ श्री. | विठ्ठल लक्ष्मण सुबंध, पुणें | ११–०–० |
| ,, ,, ,, | चिंतामण रंगनाथ अंतुरकर, पुणें | ११–०–० |

# मनमाड स्टेशनवरील श्रीबाबांचे भक्त पर्वतबुवा हमाल

## श्रीदत्तचित्साइ सद्गुरुभ्योनमः

श्रीसाइलीला संपादक महाशय यांस—

सप्रेम कृतानंत शिर सा. न. वि., वि. खालील मजकुरास कृपेनें श्रीसाइलीलेच्या एखादे अंकीं स्थान मिळावें अशी नम्र विनंति आहे.

सालमजकुरच्या गुरुपौर्णिमेकरितां घाईघाईनें ता. १६–७–३२ रोजीं सहकुटुंब सकाळचे अलाहाबाद एक्स्प्रेसनें ठाण्याहून निघालों. बरोबर ठाण्याचे पब्लिक प्रॉसिक्युटर श्री. भाईसाहेब चित्रे, त्यांचें कुटुंब सौ. गोपिकाबाई, त्यांची कन्या कुमारी कुसुमताई, मावशीबाई, कारकुन श्री. फाटक व त्यांचा नोकर श्री. दामा ही मंडळी पूर्वी ठरल्याप्रमाणें त्याच गाडीनें श्रीक्षेत्र शिरडीस येण्या-करतां निघाली. त्याच दिवशीं सुमारें ४ वाजतां शिरडीस सर्वजण पोंचलो. गाडींत जागा चांगली मिळाली. एका गालबोटाखेरीज सर्व प्रवास आनंदांत झाला. भाईसाहेब चित्रे, श्री. बाळासाहेब चौबळ वगैरे ३–४ मंडळीसह गुरुपौर्णिमेच्या दिवशीं रविवारीं दाखल झाले. भाईसाहेब व त्यांची मंडळी मंगळवारीं ठाण्यास परत गेली. मी, श्री रा. ब. मोरेश्वरराव प्रधान, श्री. सुंदरराव नवलकर व त्यांच्याबरोबर असलेलीं सुमारें २० मंडळी मिळून आम्ही उत्सव आटपून बुधवारीं सकाळीं स्पेशल मोटारनें शिरडीहून सकाळीं निघून बेलापूर स्टेशनवर आलों. तिकिटमास्तर म्हणाले कीं, पंढरपूरच्या यात्रेकरूंची फार गर्दी असल्यामुळें गाडींत सामान ठेवण्यास व बसण्यास जागा मिळणार नाहीं. आम्ही सर्वांनीं श्रीसाईमाउलीचा धांवा केला. आमच्या मंडळींत बायका-माणसें व मुलेंबाळेंही बरींच होतीं, व सामानही बरेंच होतें; गाडी स्टेशनवर आली. आम्हांस कशीबशी जागा तर मिळाली व आमचें सर्व सामानही आमच्या डब्यांत आलें.

आतां आम्हां सर्वांस काळजी वाटूं लागली ती मनमाड स्टेशनची. परंतु पूर्ण श्रद्धा ठेवून श्रीसाइमाउलीची आठवण केली व तिचा धावा केला कीं ती कोणत्या तरी रूपानें तिच्या भक्तलेंकरांस साहाय्य करण्यास तयार असते.

आमची गाडी मनमाड स्टेशनांत आली. मुंबईकडे जाणाऱ्या अलहाबाद एक्स्प्रेसला येण्यास बराच अवकाश होता. तथापि आमच्याबरोबर लेंढा फार. म्हणून जास्त काळजी वाटूं लागली. आम्ही अलहाबाद एक्स्प्रेसच्या प्लॅटफॉर्मवर येतों तों फार वर्षांपासून कै. काकासाहेब दीक्षीत वगैरे शिरडीस जाणाऱ्या येणाऱ्या मंडळीस मनमाड स्टेशनवर शक्य ती मदत करणारे श्रीबाबांचे परम भक्त पर्वत नांवाचे हमाल रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांनीं पाहिले. श्री. भाऊसाहेब धैसास हे या स्टेशनवर फार वर्षें पोस्टल मेल सर्व्हिसकडे नोकर असून या स्टेशनवर येणाऱ्या जाणाऱ्या उतारूंस पण त्यांतही विशेषेंकरून शिरडीस जाणाऱ्या येणाऱ्या श्रीबाबांच्या भक्तांस मनोभावें शक्य ती मदत करीत असत. हल्लीं रामभाऊ उर्फ भाऊसाहेब धैसास ह्या स्टेशनवरून बदलून दुसरीकडे गेले. त्यामुळें पूर्वींसारखी आपली व्यवस्था कोण करणार अशा विचारांत मंडळी असतां मोरेश्वरराव प्रधान यांनीं श्री. पर्वत हमाल यांना ओळखलें. पूर्वींपेक्षा पर्वत हमाल यांचा या वेळचा थाट कांहीं और होता! हे मराठे जातीचे इसम असून ३५–४० वर्षांच्या वयाचे आहेत. हे नंबर ८ चे पोर्टर आहेत. यांनीं ६ महिने न बोलण्याचें व्रत पाळलें आहे. यांचा सर्व व्यवहार खुणेनें चालतो. ६ महिन्यांपैकीं चार महिने व्रतपालनांत गेले आहेत व आतां फक्त दोनच महिने शिल्लक राहिले आहेत. यांनीं दाढी वाढविली आहे व मस्तकावर जटाभार राखला आहे. यांना येथें बिल्लेवाला, दाढीवाला, देवभक्तबोवा किंवा पर्वत पोर्टर असें म्हणतात. हे फार प्रामाणिक आहेत व नेहमी देवभक्तींत रंगलेले असतात; पण स्टेशनवर आपलें काम चोख रीतीनें बजावतात, असें मनमाड स्टेशनवरील इतर हमाल लोक सांगतात. हे या स्टेशनवर सुमारें २० वर्षें आहेत. हे नाशिक जिल्ह्यांतील अनुकड गांवचे राहणारे आहेत.

अनुकड हा गांव मनमाडपासून २ कोस लांब आहे. यांना स्वतःचें एक कुटुंब, ५-६ वर्षांची एक मुलगी व तीनचार वर्षांचा एक मुलगा आहे. हे श्रीबाबांचे परम भक्त आहेत. यांच्या घरीं बाबांचा एक फोटो आहे. त्याची ते नित्यनेमानें रोज पूजा करितात. रोज बाबांच्या नांवाचा एक हजार जप करितात. यांच्या गळ्यांत जानवें, एक रुद्राक्षांची व तांबडया मण्यांची व एक तुळशीच्या मण्यांची माळ असते. तुळशीच्या मण्यांच्या माळेंत बाबांच्या लांकडी कृष्णवर्णाच्या लहानशा पादुका बसविलेल्या आहेत. हे चहा कधीं घेत नाहींत. स्टेशनवरील काम आटोपलें कीं हे रोजच्या रोज पायीं अनुकड येथें आपल्या घरीं जातात, व दुसऱ्या दिवशीं पायींच कामाकरितां स्टेशनवर येतात. स्टेशनवरून घरीं बाबांचें भजन करीत जातात व घरून स्टेशनवर बाबांचें भजन करीत येतात. याप्रमाणे त्यांचा नित्यक्रम आहे.

हे शिरडीस २-३ वेळां गेले होते. बाबांच्यासंबंधाचे त्यांच्याजवळ कांहीं अनुभव आहेत. ते बाबांचे भक्त कसे बनले व त्यांचे अनुभव काय आहेत, यांबद्दलची हकीकत त्यांचें मूक व्रत दोन महिन्यांनीं पुरें झाल्यावांचून समजण्यास मार्ग नाहीं. यांचा चेहरा नांदेड येथील गुप्त सत्पुरुष श्रीमोलां-बुवा हमाल यांच्याचसारखा दिसतो.

असो. रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांनीं पर्वतबोवांना, काकासाहेबांच्या वेळचे ते हेच असें ओळखून त्यांना पूर्वीची हकीकत विचारली. बुवांनीं त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें खुणेनें दिलीं, व आपण शिरडीहून आलेल्या सर्व मंडळींची चहा-पाण्याची व्यवस्था, त्यांना दोन तास बसण्याची व्यवस्था व गाडींत स्वतंत्र डबा उघडून देण्याची व्यवस्था करतों असें खुणेनें मोरेश्वररावांस सांगितलें. त्याप्रमाणें हॉटेलवाल्याकडे जाऊन पहिल्या प्रतीचा चहा करून आणिला. सर्वांना बसण्यास वेटिंगरूममध्यें जागा दिली, व गाडी आल्याबरोबर बहुतेक रिकामा असलेला असा डबा पाहून त्यांत आम्हां सर्वांस सामानासुद्धां बसण्यास सोय करून दिली. श्री. भाऊसाहेब धैसास तेथें नसल्यामुळें भासणारी गैरसोय याप्रमाणें दूर

करून श्रीसाईमाउलीनें श्री. पर्वतबुवांच्या रूपानें आम्ही मनांत वाहात असलेल्या सर्व काळजीचा परिहार करून आम्हांस आपापल्या घरीं आनंदांत आणून पोंचविलें. माऊलींची लीला अगम्य तर खरोंच !

श्री पर्वतबुवांची बाकीची हकीकत पुढील खेपेस देईन.

हें चतुष्पत्री वाक्सुमन जगज्जननी श्रीसाईमाउलींच्या पवित्र चरणयुगुलावर अनंत प्रणिपात करून अनन्य भावें अर्पण करून हा अल्प लेख संपवून आपली रजा घेतों.

संतदासानुदास,

ठाणें, गुरुवार ता. २१।७।३२. बाबांचें बाळ.

# पिशाच्च योनी

# व

# श्रीसद्गुरु साईबाबांची लीला व त्यावर सुचलेले विचार.

## श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योनमः

कृ. शि. सा. न. वि. वि.

"पिशाच्च योनी" या शीर्षकाखाली "म्हातारा" या सहीनें श्रीसाइलीलेच्या ८ व्या वर्षाच्या तिसऱ्या म्हणजे ज्येष्ठ महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झालेला सुंदर लेख, अनुभव व आपलें आधुनिक शास्त्रीत्या श्रीबाबांच्या कृतीचें केलेलें स्पष्टीकरण वाचून आनंद झाला. बाबांच्या कृति किंवा लीला प्रसंगानुसार ज्या ज्या होत असत त्यांचें चुटपुटतें ज्ञानही अधुनिक शास्त्रज्ञांस होत नसल्यामुळें त्यांचा कल नेहमी बाबांच्या लीलेवर एक खुळेपणाची टीका करून हे स्वयंमन्य पंडित बाबांना वेड्यांत काढीत असतात! आपले "पिशाच्च योनी" व "शास्त्रप्रवीणांना प्रश्न" हे व अशाच प्रकारचे लेख व त्यांतील बाबांच्या लीलेचें शास्त्रसिद्ध स्पष्टीकरण ही अहंमन्यतेचा रोग जडलेल्या व म्हणून प्रत्येक गोष्ट शास्त्रोपनेत्रांतून पाहणाऱ्या या अधुनिक शास्त्रप्रवीणांना त्रैलोक्यचिंतामणीची मात्राच आहे.

असो. पिशाच्चयोनीवर सुचलेले विचार खालीं देत आहें.

१. ज्या ८४ लक्ष किंवा असंख्य योनी आहेत त्यांत पिशाच्च किंवा भुतेंखेतें यांची एक स्वतंत्र योनी आहे. त्यांना प्रत्यक्ष अस्तित्व आहे.

२. ती स्वर्गलोकाच्या खाली व मनुष्यलोकावर अंतरालामध्यें वावरणारी व राहाणारी योनी आहे.

३. पिशाच्चें हीं क्षुद्र दैवतें अथवा उपदैवतें नसून देवयोनींपैकींच आहेत.

४. त्यांना वर्तमान, भूत व भविष्याचें ज्ञान असतें.

५. त्यांना सजीव मानवकायेंत प्रवेश करितां येतो.

६. त्यांच्यांत उच्च नीच व मध्यम अधिकार असून त्यांना बरेवाईट स्वभावही आहेत. त्यांचें स्वतंत्र राज्यच आहे.

७. तीं ज्यावर रुष्ट होतात त्यांचा तीं छळ करतात व ज्यावर प्रसन्न होतात त्यांना सांसारिक बारिकसारीक पण मनुष्यास अगम्य अशा आपत्तींतून मुक्त होण्याचे मार्ग अगर साधन सांगून मदत करितात.

८. सर्वव्यापी निर्गुण परमात्माच त्यांच्या शरीरभूमिकेंत वास करून त्यांच्या त्या त्या उपासकांच्या बऱ्यावाईट कर्माप्रमाणें तसतशीं फळें देतात.

९. पिशाच्चांना वाटेल तो आकार धारण करून वाटेल त्या स्थल संचार करितां येतो.

१०. श्रीसाईलीलेच्या ७ व्या वर्षाच्या ३–४ या अंकांत आपण भगवान श्रीसद्गुरु बाबा व आपलें कुटुंब यांच्यांत झालेला संवाद व त्याच वर्षाच्या १ व्या अंकांत आपला व एक तरुण डाक्टर यांच्यामध्यें "पटकी किंवा कॉलरा महामारी किंवा वाखा" व बाबांचें अशा प्रसंगी श्रीक्षेत्र शैलधी ( शिरडी येथील शिवेच्या ओढयांत बाबांनीं स्वहस्तानें श्रीद्वारकामाईत दळलेलें पी टाकणें व या कृतीपासून अगर लीलेपासून त्या रोगाचा नाश होणें या संबंधानें झालेला संवाद जो आपण छापून प्रसिद्ध केला आहे त्यावरून वरील सिद्धांतच खरे ठरतात.

ओवरील सिद्धांतांना श्रीभगवद्गीतेंत, श्रीज्ञानेश्वरींत व अमरकोशां ...डतो.

यांति देवव्रताः देवान् पितॄन्यांति पितृव्रताः।
भूतानि यांति भूतेज्याः यांति मद्याजिनोऽपि माम् ॥ २५.

श्री भ. गी. अ. ९ श्लो. २५

मनें यान्या करणीं । जयांचिया भजनीं देवांचिया वाहणीं ।
ते शरीर जाति ये क्षणीं । देवचि झाले ॥ ५५ ॥

अथवा पितरांचीं व्रतें । वाहती जयांचीं चित्तें ।
जीवित सरलिया तयांतें । पितृत्व वरी ॥ ५६

कां क्षुद्र देवतादि भूतें । तियेंचि जयांचीं परम दैवतें ।"
जिहीं अभिचारिकीं तयातें । उपासिली ॥ ५७ ॥

श्रीज्ञानेश्वरी अ. ९, ओं. ३५५-५६-५७.

" यजंते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजंते तामसा जनाः" ॥ ४ ॥

श्री भ. गी. अ. १७, श्लो. ४.

" तरी सात्विक श्रद्धा । जयाचा होय बांधा ।
तयां बहुतकरूनि मेधा । स्वर्गीं आथी ॥ ७६ ॥

ते विद्याजात पढती । यज्ञक्रिये निवडती ।
किंबहुना पडती । देवलोकीं ॥ ७७ ॥

आणि श्रद्धा राजसा । घडले जे वीरेशा ।
ते भजती राक्षसां । खेंचरा हन ॥ ७८ ॥

श्रद्धा जे का तामसी । ते मी सांगेन तुजपाशीं ।
जे केवळ पापराशी । अति-कर्कशे निर्दयत्वें ॥ ७९ ॥

जीववधें साधूनि बळी । भूतप्रेतकुळें मेळीं ।
स्मशानीं संध्याकाळीं । पूजिती जें ॥ ८० ॥

श्रीज्ञानेश्वरी अ. १७, ओं. ७६-७७-७८-७९-८०.

" यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ २१ ॥

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।
लभते च ततः कामान् मयैव विहितान्हितान् ” ॥ २२ ॥

श्री भ. गी. अ. ७, श्लो. २१-२२

“ पै जो जियें देवतांतरीं । भजावयाची चाड करी ।
तयाचीं ते चाड पुरी । पुरविता मी ॥ ४३ ॥

मग तिया श्रद्धायुक्त । तेथींचें आराधन जें उचित ।
तें सिद्धीवरी समस्त । वर्तों लागे ॥ ४५ ॥

ऐसें जेणें जें भाविजें । तें फळ तेणें पाविजें ।
परी तेंही सकळ निपजें । मजचिस्तव ॥ ”

श्रीज्ञानेश्वरी अ. ७, ओं. १४३-४५-४६.

विद्याधराप्सरो यक्ष रक्षो गंधर्व किन्नराः ।
पिशाचो गुह्यकः सिद्धो भूतोऽमी देव योनयः ॥ ११

अमरकोश प्रथम कांड, स्वर्ग वर्ग श्लो. ११,

पिशाच्चांच्या देहांत व स्वप्नांतील लिंग किंवा सूक्ष्म किंवा वासना-देहांत फार फरक आहे. लिंग किंवा सूक्ष्म देह निद्रावस्थेंत आपणच धारण करून सर्व स्वप्न सृष्ट पदार्थ आपणच बनतो. या अवस्थेंतील वर्तमान, भूत व भविष्यकथन कधीं कधीं सत्य ठरतें.

पिशाच्च्यांना जसा वाटेल तो देह धारण करतां येतो तसा योग्यांनाही धारण करतां येतो. पूर्ण ज्ञानी किंवा योगी ज्या योनीत व देहांत जन्मले असतील तो देह संजीवित्वानें कायम ठेवून त्यांना वाटेल त्या ठिकाणीं त्याच अगर वाटेल त्या देहांत प्रकट होतां येतें किंवा वाटेल त्या सजीव मानव कायेंत प्रवेश करतां येतो. परंतु पिशाच्च्याप्रमाणें ते कोणास छळीत नाहींत. फक्त चमत्कारापुरत्याच या लीला दाखवतात. याबद्दलचें अति रम्य व सुरस वर्णन स्वतः भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं श्रीज्ञानेश्वरींतील ६ व्या अध्याया-वरील भाष्याच्या ओंव्यांत केलें आहे.

पिशाच्च्यास स्थूल किंवा दृश्य शरीर नाहीं. यांच्यांत श्रीमंत, मध्यम, दरिद्री, भिकारी, खाण्यासाठीं वखवखलेली अशा पुष्कळ तऱ्हा आहेत.

हीं भुतेंखेतें व पिशाच्चें क्षुद्र दैवतांत मोडलीं जातात, व देवयोनीत गणलीं जातात.

पूर्ण ज्ञानी, पूर्ण योगी, पूर्ण सिद्ध हेही कधीं कधीं " बालोन्मत्त **पिशाच्चवत्** " या अवस्थेंत राहतात. आपलें ज्ञान, आपला अधिकार आपलें ऐश्वर्य कोणास कळूं नये म्हणून ते कधीं कधीं यांपैकीं एखाद्या अवस्थेचा अगर निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या अवस्थांचा अवलंब करून उन्मत्त व बेपर्वा जगापासून दूर राहतात.

संस्कृतांत पिशाच्चास, भूत, पिशाच, वेताल, निशाचर, प्रेतनर, ब्रह्मग्रह, ब्रह्मपिशाच, ब्रह्मपुरुष, ब्रह्मराक्षस किंवा ब्रह्मरक्षस् असें म्हणतात.

याच अगर इतर क्षुद्र देवतांना प्राकृतांत, देवी, हडळ, समंधं, ब्रह्मसमंध, चेडा, बहिरी, म्हसोबा, जानुबाई खैराबाई, पीर या व अशाच प्रकारच्या इतर नांवानें संबोधितात.

विद्वद्वर्य, कविश्रेष्ठ व भक्तवर वामनपंडितांची व पिंपळाच्या झाडावर बसून खांदीसाठी भांडणाऱ्या ब्रह्मसमंधाची आख्यायिका सुप्रसिद्धच आहे.

श्रीनरसोबाच्या वाडीस दररोजच्या रात्रीच्या आरतीच्या वेळीं कित्येकांचे अंगांत येऊन श्रीदत्तमंदिराच्या खांबास बळकट मिठी मारून तासांचे तास पिंगा घालण्यानें अंगाचा खुर्दा करणाऱ्या, देवेकडे सूर काढून रडणाऱ्या व भयानक किंकाळ्या फोडणाऱ्या अंगात आलेल्या पिशाच्चांच्या मजा मी स्वतः डोळ्यांनीं पाहिलेल्या आहेत व लाखों गृहस्थांनीं पाहिल्या आहेत व असंख्य लोक हल्लींही पाहात आहेत.

माझ्या स्वतःच्या एका शेतावर एक म्हसोबाचें देवस्थान आहे, दुसऱ्या शेतावर जानाईचें व खैराईचे देवस्थान आहे. हीं तिन्हीं दैवतें माझ्या लहानपणीं आमच्या राघु हरपुडा नांवच्या नोकराच्या अंगांत येत असत

व माझे वडील घरांत कोणी फार दिवस आजारी पडलें व औषधानें त्यास गु येत नाहीं असें ठरल्यास राघूस बोलावून त्याच्या अंगांत आणतीत व त्य दैवतास विचारीत म्हणजे कोणाची जत्रा चुकली असल्यास अगर कोणास ज कांहीं वार्षिक द्यावयाचें अथवा कोणाचा देव-ब्राह्मण करावयाची मुदत चुकून गेली असल्यास ती अंगांत आलेली देवता तें सांगे, व त्याप्रमाणें केलें म्हणजे तो माणूस आजारांतून लागलाच बरा होई.

अलीकडील शास्त्रज्ञ वरील गोष्टीवर विश्वास ठेवीत नाहींत. ते अशा प्रकाऱ्या संचारास वायु किंवा अशींच कांहीं नांवें देतात. परंतु भुतानें झपाटलेल्या मुलांस किंवा माणसास कोणतेंही औषध दिलें तरी त्याचा उपयोग न होतां तें भूत जें मागत असेल तें दिलें म्हणजे त्याचा आजार तावडतोब बरा होतो, याचा अर्थ काय ? याचा उलगडा क्षुद्र दैवतांची एक स्वतंत्र योनी आहे, असें मानल्यावांचून होत नाहीं व यास श्रीबाबांच्या मुखाचा श्रीभगवद्गीता, श्रीज्ञानेश्वरी, अमरकोश वगैरे जनमान्य महाग्रंथांचा आधार आहे.

**स्रग्धरा.**

कुत्ता ना हाल खाई मम, भवि मिळतो, नित्य दायाद उत्ता ।  
श्रीवित्तापासुनीया, विमुख करिं विभा, शीघ्र उन्मत्त चित्ता ॥  
कित्ता घालूनि देई, तव पदिं रतिचा, त्वत्करीं सर्व सत्ता ।  
बेपत्ता वा न होई, मम नयनिं वसे प्रार्थना साइदत्ता ॥

वरील षट्दल वाक्पंकज श्रीसद्गुरु बाबांच्या पुण्य व पेलव अंघ्रियुगुलावर प्रेम, विनय व अत्यादरपूर्वक शुद्ध अंतःकरणानें अर्पण करून आपला रजा घेतों.

ठाणें, गुरुवार मिती श्रावण शु. १०  
शके १८५४; ता. १०–८–३२.

**बाबांचें बाळ.**

## श्रीसाईबाबा शिर्डीसंस्थानच्या भक्तमंडळाची वार्षिक सभा

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाची अकरावी वार्षिक सभा आषाढ शु॥ १५ शके १८५४ रविवार ( ता. १७-७-३२ ) रोजी शिर्डी येथें कै. भाऊसाहेब अथवा काकासाहेब दीक्षितवाड्यांत संध्याकाळीं ५॥ वाजतां भरली होती. त्या वेळीं खालील सभासद हजर होते.

१ रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.
२ श्री. बाळकृष्ण विश्वनाथ देव.
३ ,, माधवराव बळवंत देशपांडे.
४ ,, तात्याजी गणपत पाटील कोते.
५ ,, बापूजी राघोजी बोरावके.
६ ,, रामचंद्र आर. सामंत.
७ श्री. गजानन शिवराम पाटणकर.
८ ,, सुंदरराव दिनानाथ नवलकर.
९ श्रीमंत पूर्णचंद्र गोपाळ बुटी.
१० सौ. जानकीबाई बाळकृष्ण देव.
११ सौ. शांताबाई सुंदरराव नवलकर.

श्रीयुत बापूजी रा. बोरावके यांनीं सूचना मांडली व त्यास श्रीयुत बा. वि. देव अथवा बाळासाहेब देव यांनीं अनुमोदन दिल्यावरून रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें.

मागील ता. २८-३-३१ रोजीं ( चैत्र शु॥ ९ शके १८५४ ) नववी व दहावी वार्षिक सभा शिर्डी येथें भरली होती; त्या सभेचें टिपण वाचून सर्वानुमतें मंजूर झाल्यावर त्यावर अध्यक्षांनीं सही केली.

संस्थानचा १०वा व ११ वा म्हणजे शके १८५२ व १८५३ सालांचा अहवाल वाचून सादर केल्यावर ( अहवाल श्रीसाईलीलेच्या आषाढ शके १८५४ महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे.) पुढील ठराव मंजूर झाले.

**ठराव नं. १:**—संस्थानचा १०वा व ११ म्हणजे शके १८५२ व १८५३ सालाचा अहवाल वाचून सादर केलेला मंजूर आहे. सर्वानुमतें मंजूर.

**ठराव नं. २**:—संस्थानचा शके १८५२ व १८५३सालांचे हिशोब हिशोबतपासणीसांकडून तपासलेले आहेत ते मंजूर आहेत. सर्वानुमतें मंजूर.

**ठराव नं. ३**—आजची श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाची ११ वी वार्षीक सभा भक्तमंडळाचे सभासद व संस्थानचे सन्माननीय हिशोबतपासणीस श्रीयुत जिवाजी कृष्ण परुळकर यांनीं संस्थानचे शके १८५२ व १८५३ सालचे हिशोब स्वखुशीनें व आनंदानें मेहनत घेऊन कांहीं मोबदला न घेतां तपासले याबद्दल त्यांचे अत्यंत आभार मानते. सर्वानुमतें मंजूर.

( हिशोब श्रीसाईलीलेच्या कार्तिक शके १८५३ व आषाढ शके १८५४ च्या अंकांत प्रसिद्ध झाले आहेत. )

**ठराव नं. ४**—आजची श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाची अकरावी वार्षिक सभा कै. अण्णा चिंचणीकर यांचे विश्वस्तांतर्फे बडोद्यांचे माजी सर न्यायाधीश व मुंबई हायकोर्टाचे ॲडव्होकेट श्रीयुत रामदत्त विठोबा देसाई व शिर्डी संस्थान तर्फे मुंबई हायकोर्टाचे ॲडव्होकेट व ॲसिस्टन्ट सरकारी वकील श्रीयुत बाळाजी गणपत राव या उभयतांनीं कांहींएक मोबदला न घेतां आनंदानें अंतःकरणपूर्वक कै. अण्णा चिंचणीकर यांच्या वुईलच्या बाबीसंबंधीं ठाणे येथील डिस्ट्रिक्ट जज्जाच्या निकालावर मुंबई हायकोर्टात रिव्हिजन अर्जाचें काम चालविलें त्याबद्दल त्यांचे अत्यंत आभार मानते.

सर्वानुमतें मंजूर.

अध्यक्षांचे आभार मानल्यावर सभेचे काम संध्याकाळीं ६॥ वाजतां संपलें.

शिर्डी, ता. १७।७।३२.
आषाढ शु॥ १५ शके १८५४.

**सुंदरराव दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस.

# श्रीसद्गुरुसाईबाबा



## पुण्यतिथीउत्सव

शिर्डी ता. १ सप्टेंबर १९३२.

कृ. सां. न. वि. वि. आधुनिक संतचूडामणि सच्चिदानंद श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबामहाराज संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांची १४ वी पुण्यतिथी येत्या आश्विन शु.॥ १० शके १८५४ रविवार (ता. ९-१०-३२) रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बाल गोपाळांसह व मित्रमंडळीसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

आपले नम्र साईदास,

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस.
साई भुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.
रा. आ. तर्खड, ऑ. खजिनदार,
१० जर मॅन्शन, वांद्रें.
बापुराव रा. बोरावके,
ऑ. दुय्यम चिटणीस.
रघुवीर भा. पुरंदरे
ऑ. दु. खजिनदार.

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान,
तात्याजी गणपत पाटील [illegible]
बाळकृष्ण विश्वनाथ देव,
सखाराम बळवंत धुमाळ,
वासुदेव नारायण चांदोरकर,

**श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानचे**
**विश्वस्त. (ट्रस्टीज**

# उत्सवाचा कार्यक्रम

## आश्विन शु॥ ९ शके १८५४ शनिवार ( ता. ८-१०-३२ )

### उत्सवास प्रारंभ

पहांटे ५ ते ६ सनई चौघडयासह नित्याप्रमाणें काकड आरती.

सकाळीं ६ ते ८ श्रींचे समाधीवर रुद्राभिषेक व समाधीपुढें सनई चौघडयाची नित्याप्रमाणें हजेरी.

९ ते १० श्रींचे समाधीस मंगलस्नान, वस्त्रपरिधान, षोडशोपचार पूजा, श्रींच्या प्रधान लेंडीबागेंतील पुष्पहार व तुलसी, दुर्वासमर्पण.

१० ते १२ श्रींचे समाधीपुढें श्री. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांचें कीर्तन.

१२ ते १ दुपारची नैतिक आरती.

दुपारीं २ ते ३ ब्राह्मण व पाहुणे मंडळीचें भोजन.

३ ते ४ श्रींचे समाधीपुढें श्री. नानु पुजारी यांचें नैतिक पुराण.

५ ते ६ श्रींचे समाधीपुढें श्री. बाळा चोपदार यांचें नैतिक चक्री भजन.

सायंकाळीं ६ते७ सायंकाळची नैतिक आरती.

रात्रीं ८ ते ९ रथाची मिरवणूक व गारुड.

९ ते ११ नैतिक शेजारती व भजन.

## आश्विन शु॥ १० रविवार (ता. ९-१०-३२) पुण्यतिथी दिवस

पहांटे ५ ते ६ वरप्रमाणें.

सकाळीं ६ ते ८ रुद्राभिषेक व पवनाभिषेक.

सकाळीं ८ ते ९ भिक्षा.

९ ते ११ वर ९ ते १० प्रमाणें.

११ ते १ श्री. बाळासाहेब देव यांचें श्रीसाईबाबा पुण्यतिथी आख्यान, कीर्तन व दुपारची नित्य आरती.

दुपारीं १ ते २ पुण्यतिथी आराधनविधि.

२ ते ४ तीर्थप्रसाद भोजन.

४ ते ५ श्रींचे समाधीपुढें नैतिक पुराण.

५ ते ६ ,, ,, चक्री भजन, व शिर्डी संस्थान कार्यकारी मंडळाची सभा व सीमोल्लंघन.

संध्याकाळीं ५ते७ इतर मंडळीचें भोजन.

६ ते ७ सायंकाळची नित्य आरती.

रात्रीं ८ ते ९ पालखी व गारुड.

९ ते ११ शेजारती व भजन.

## आश्विन शु॥ ११ सोमवार ( ता. १०-१०-३२ )

पहांटे ५ ते ६ वरप्रमाणें.

सकाळीं ६ ते ७ रुद्राभिषेक वरप्रमाणें.

९ ते १० वरप्रमाणें.

११ ते १२ श्रींची नित्याप्रमाणें दुपारची आरती

दुपारीं १२ ते २ फराळ व भोजन.

४ ते ५ श्रींचे समाधीपुढें श्री. बाळासाहेब देव यांचें पुराण.

सायंकाळीं ५ते६ ,, ,, चक्री भजन.

६ ते ७ सायंकाळची आरती.

रात्रीं ८ ते ९ रथाची मिरवणूक व गारुड.

९ ते ११ श्री. बापाजी कुळकर्णी यांचें कीर्तन, शेजारती व भजन.

## आश्विन शु॥ १२ मंगळवार (ता. ११-१०-३२) काला

| | |
|---|---|
| पहांटे ५ ते ६ | सकाळीं ६ ते ८ व ९ ते १० वर प्रमाणें. |
| सकाळीं ११ते१ | श्री. बापाजी कुळकर्णी यांचें काल्याचे कीर्तन. |
| दुपारीं १ ते २ | दुपारची आरती. |
| २ ते ३ | भोजन. |
| ४ ते ५ | श्री. बाळासाहेब देव यांचें ज्ञानेश्वरी पुराण |
| ५ ते ६ | चक्री भजन. |
| सायंकाळीं ६ते७ | सायंकाळची नैतिक आरती. |
| ६ ते ९ | भंडारा भोजन. |
| रात्रीं ९ ते १० | शेजारती व भजन. |

॥ ३० ॥ धनु ओढून आकर्ण। प्रेरिते झाले तीव्र बाण। जो सं सं शब्द करून। निघता झाला चपलेवत् ॥ ३१ ॥ सारिपाट नेमका। उडविला बाणें तेधवां देखा। खाजामर्दूद पडला फिका। तें कृत्य पाहोनी ॥ ३२ ॥ म्हणे धन्य याचें संधान। हा मर्शी अजिंक्य पूर्ण। यासी झगडतां आमुचे प्राण। निघून जातील निश्चयें ॥ ३३ ॥ खानानें काढिला पळ। छावणी सोडून तात्काळ। एकचि उडाली खळवळ। शिखांनीं त्यास गांठिलें ॥३४॥ रणकंदन माजलें फार। उल्लाट यंत्राचा तो धूर। आक्रमिता झाला अंबर। सूर्य त्यानें झांकोळला ॥ ३५ ॥ चमचमा तळपती तरवारी। जैशा विजा मेघोदरीं। स्वार आले घेऊन करीं। फेकूं लागले अनिवार ॥३६॥ कडाबीन बंदूक जेजाला। बाण पट्टा बर्ची भाला। वाघनखें घालून हस्ताला। झगडूं लागले वीर ते ॥ ३७ ॥ यवन ह्मणती अल्लाअल्ला। शीख आठवतीं ईश्वराला। असंख्य अविंध धरणीला। लोळूं लागले शस्त्र घातें ॥३८॥ कित्येक कबंध घुमती। रक्ताच्या नद्या वाहती। घारी गिधाडें वाट पाहती। भक्षण त्यांचें करावया ॥३९॥ कोल्हे हुकी हुकी करिती। रणभूमीस वेढे देती। देव जयजयकार करिती। गुरुजीचा स्वर्गांत ॥४०॥ घोडे हत्ती कैक मेले। वीर मातीस मिळाले। जे भ्याड ते पळून गेले। जीव घेऊन आपुला ॥४१॥ धन्य धन्य ते शीख वीर। धर्मरक्षक उदार धीर। त्यांच्या जयशब्दें अंबर। गेलें असे कोंदाटूनी ॥ ४२ ॥ अपेश आलें खाजाशीं। लोक पडले बहुवसीं। तें ऐकून शहासी। दुःख झालें अनिवार ॥ ४३ ॥ परी न सोडितां धीर। बादशहा तो आलम-गीर। कपटव्यूह रचूनि थोर। समर्थासी गांठिलें ॥ ४४ ॥ समर्थाच्या तीन कांता। परम भाविक पतिव्रता। त्यांचीं नांवें तुह्मांकरितां। देतों ऐका ये ठायीं ॥ ४५ ॥ सुंदरी साहेब देवा विजया। त्यांत सुंदरी जीचे ठायां। दोन पुत्र गुरुराया। झाले अती बलवान ॥ ४६ ॥ अजितसिंग

झुंझारसिंग। धनुर्धारी परम योग्य। जेवीं लवांकुश चांग। पुत्र रामचंद्राचे ॥ ४७ ॥ फत्तेसिंग जोरावर। विजयदेवीचे कुमार। हेही निघाले बहाद्दर। साहेब देवीस कांहीं नसे ॥ ४८ ॥ गुजरीजीच्या आग्रहानीं। आनंदपूर सोडिलें अवघ्यांनीं। सिरंद चमकोण्यांत येवोनी। राहाते झाले गढींत ॥ ४९ ॥ ती खबर अविंधासी। तात्काळ कळली निश्चयेंसी। त्यांनीं वेढिले चमकोण्याशीं। खबर गुरुची घ्यावया ॥ ५० ॥ तेथें युद्ध झालें घनघोर। पडले दोघे कुमार। अजित आणि झुंजार। रणभूमीसी श्रोते हो ॥ ५१ ॥ कांता आधींच मारिल्या। गुजरी घेऊन नातवाला। ज़ोरावर फत्तेसिंगाला। गेली सिरंदा कारणें ॥ ५२ ॥ यावेळीं गुरुजीचे। संगतीं चाळीस शीख साचे। अनुष्टुप झालें दारूचें। गोळा अवघा संपला ॥ ५३ ॥ तैं धरमसिंग मानसिंगादि। गुरुरायाची छात्रमांदी। ह्मैस मारून काढणें वादी। योग्य न म्हणती ये वेळा ॥ ५४ ॥ झुंझार आणि अजित। दोघे पुत्र झाले मृत। समर्था या लढाईत। आतां काय करावें ॥ ५५ ॥ महाराज म्हणती भिऊं नका। स्मरा वैकुंठनायका। तो न दगा देईल देखा। मात्र निष्ठा असावी ॥ ५६ ॥ माती ठासा रे वंदुकींत। तीच होईल दारुवत। धर्मयुद्ध करण्या सत्य। साह्य होती पंचभूतें ॥ ५७॥ गोळयांऐवजीं दगड घाला। करा स्वधर्म रक्षणाला। तेणें आनंद शिखांला। झाला श्रोते पुनरपि ॥ ५८ ॥ माती ठासून वंदुकीस। दम धरिला तीन दिवस। परी यवनांचें बळ विशेष। गढी त्यांणीं वेढिली ॥ ५९ ॥ सेनासमुद्र गढीभोंवतीं। उल्हाट यंत्राचे वार होती। ते पाहून शीख अती। झाले असती भयाभीत ॥ ६० ॥ आतां गुरुजी हाच विचार। येथून पळावें सत्वर। हा यवनांचा सेनासागर। फार खवळला येवेळां ॥ ६१ ॥ वेष संगतसिंगासी। तुमचा देऊन निश्चयेंसी। बैसवूं या गढीसीं। यवनांतें फसवावया ॥ ६२ ॥

तेणें अविघ्न ठकतील। आपुलें काय होईल। सगंतलिंग जाईल। मात्र एक अवध्यांस्वत ॥ ६३ ॥ तें मानलें गुरुजीसी। वेष संगतसिंगासी। देते झाले पुण्यराशी। धर्मरक्षण करण्यास्तव ॥ ६४ ॥ संगत म्हणे धन्य धन्य। धर्मार्थि येतें मरण। ही काया ओंवाळून। टाकीन सद्‌गुरुवरोनी ॥ ६५ ॥ याचें नांव गुरुभक्ती। अशासीच फळें लाधती। जे नुस्त्या शब्दानें दाविती। भक्ति न ते खरे शिष्य ॥ ६६ ॥ महाराज म्हणती हे सगंता। येथें तुशीं मृत्यु येतां। पाहाशील तूं रमानाथा। वैकुंठांत वैसून ॥६७॥ तथास्तु म्हणे सगंत। गुरूस घातिलें दंडवत। आशीर्वाद देऊन त्याप्रत। महाराज गेले निघोनी ॥ ६८ ॥ समर्थ माछि वाड्यासी। राहिले जाऊन पर्वतासी। भेटले मच्छेंद्र गोरखासी। ब्रह्मचर्चा केली बहु ॥ ६९ ॥ या पुढील अवघें कथन। पुढीलाध्यायीं निवेदन। करीन तुम्हांकारण। अवधान द्यावें कथेतें ॥ ७० ॥ स्वस्ति श्री संतकथामृत। वदविता माझा रुक्मिणीकांत। अगाध गुरु गोविंद चरित। परिसा म्हणें दास गणू ॥ ७१ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥

॥ इति चतुर्थोऽध्यायः समाप्तः ॥

## अध्याय ५ वा

श्रीगणेशायनमः ॥ हे मूषकारूढगणपती । करी वास चित्तीं । काव्य रचनेस द्यावी स्फूर्ति । हेंचि आतां मागणें ॥ १ ॥ चमकोऱ्याचे सन्निध । त्या प्रांतीचें नगर प्रसिद्ध । नाम जयाचें सिरंद । तटबंदी तेथ किल्ला ॥ २ ॥ त्या सिरंद नगरांत । माता गुजरीजी आणि दोन सुत । जोरावर फत्तेसिंग सत्य । ऐसे त्रिवर्ग राहिले ॥ ३ ॥ तेथें गंगूनामें ब्राह्मण । त्याचे गृहीं तिघे जण । राहिले प्रसंग जाणून । अज्ञातवासी पांडव जसे ॥ ४ ॥ मुलांचें वय फार लहान । माता गुजरीस वृद्धपण । आले होते हो श्रोतेजन । ते काळीं साजिरें ॥ ५ ॥ घेऊन बालकें जवळ । माता चिंता वाहे सर्व काळ । हे वैकुंठपति घननीळ । कां रे निष्ठूर झालासी ॥ ६ ॥ हे माझे राजबिंडे । आंगठीवरील जेवीं खडे । किंवा विजय यशाचे हुडे । वा भासती रवि शशी ॥ ७ ॥ यांची माय आणि पिता । झालीं परदेशी तत्वतां । ह्यांचा जनक धर्माकरितां । झगडत आहे देवराया ॥ ८ ॥ माता पित्याच्या वांचून । हीं बालकें दिसती दीन । त्यांच्याकडे पाहून । दुःख करी गुजरिजी ॥९॥ मातेजवळ थैल्या तीन । ज्या मोहरांनीं भरल्या पूर्ण । त्या धनातें पाहून । गंगू लोभ पावला ॥ १० ॥ त्या द्विजाच्या आलें मनीं । कीं ह्या थैल्या चोरूनी । घ्याव्या इजपासूनी । कामीं येतील आपणा ॥ ११ ॥ तो बोलला गुजरीजीस । सांभाळा नीट थैल्यांस । आहे चोराचें भय विशेष । या ग्रामीं मातोश्री ॥ १२ ॥ गुजरीजी बोले त्यावरी । या तूंच सांभाळ निर्धारीं । माझे चित्तीं चिंता सारी । लागली मदीय पुत्रांची ॥ १३ ॥ अन्न पाणी त्यावांचून । कांहीं मसी न रुचे जाण । कधीं डोळे भरून पाहीन । मी पुत्र माझा ॥ १४ ॥ स्वधर्म रक्षणाचिये साठीं । अनंत करी खटपटी । छाती करूनियां मोठी । झुंजतसे यवनास ॥ १५ ॥ न ह्मणे हा ऊन वारा ।

वास करी दरीकंदरा । हे गुरु गोविंद माझ्या शिष्या । कोठें आहेस ये वेळीं ॥ १६ ॥ पाहून आजीचा शोक । बोलती उभयतां बालक । तूं वीरमाता आहेस देख । शोक ऐसा करूं नको ॥ १७ ॥ आमचा पिता तुझा सुत । झगडत आहे धर्मार्थ । धर्म युद्धाचें पुण्य बहुत । बोलले सूज्ञ शास्त्रांतरीं ॥ १८ ॥ जितुक्या जगीं वीरमाता । तितुक्या वंद्य रमानाथा । वीरमातेची योग्यता । आहे आगळी सर्वांहून ॥ १९ ॥ तुझी कुशी धन्य धन्य । जन्मला वीर बलवान । ज्याचें ऐकतां नांव जाण । अविंध पळूं लागती ॥ २० ॥ ऐसीं नातवंडें बोलतां । सानंद त्यांकडे पाहे माता । हात फिरवूनि मुखावरता । बोलती झाली यापरी ॥ २१ ॥ येवढ्या लहान वयांत । केवढें ज्ञान तुम्हांप्रत । तुम्ही सिंहछवि आहां सत्य । जैसी खाण माती तसी ॥२२॥ असो श्रोते एके दिनीं । त्या गंगू नामें द्विजांनीं । थैल्या नेल्या चोरोनी । नकळत मातेला ॥ २३ ॥ तेवढ्या-वरी त्याची तृप्ती । नच झाली तो पापमती । योजोनियां कपटयुक्ति । घात कराया सिद्ध झाला ॥ २४ ॥पहा पहा हो श्रोते जन । कैसें धनाचें महिमान । अजब वस्तु जगतीं धन । तात्काळ भुलवी मानवला ॥२५॥ सुभा तया प्रांताचा । वजीतखान होय साचा । जो शाहा अलमगिराचा । होता प्रिय हस्तक ॥ २६ ॥ त्या दुष्ट अविंधासी । गंगू द्विज एके दिशीं । देता झाला वरदीसी । लोभ धनाचा धरून ॥ २७ गोविंद गुरूचीं मुलें माता । ठाऊक मसी सर्वथा । तुम्ही मसीं इनाम देतां । देईन तीं पा धरून ॥ २८ ॥ ऐसें ऐकतां तद्भाषण । तो अविंध वजीतखान । गेला मनीं आनंदोन । आदर करी गंग्याचा ॥ २९ ॥ तूं राजनिष्ठ असमीपुर । हे गंगू नाम द्विजवरा । इनामतुसी देईन खरा । मोठा मुलें दावी तीं ॥३०॥ गंग्या बोले त्यावरी । करूनि कपट युक्ति खरी । मुलें आणितों येथवरी । तुम्हां समोर उदईक ॥ ३१ ॥ तो गंग्या न म्हणावा ब्राह्मण । मांगाहूनी मांग जाण । सद्गुरुचा घात पूर्ण । करावास

सिद्ध झाला ॥ ३२ ॥ जोरावर फत्तेसिंगासी । बोलता झाला दुसरे दिवशीं । चला आपण बागेसी । जाऊं सहल करावया ॥ ३३ ॥ ऐसी थाप देऊन । गेला मुलें घेऊन । कचेरीस नेऊन । उभीं केलीं शहापुढें ॥३४॥ पाहून त्या बालकांसी । चोज वाटलें शहासी । त्यांचिया स्वरूपासी । काय वर्णन करावें ॥३५॥ एक राम एक लक्ष्मण । एक हलधर एक कृष्ण । एक प्रद्युम्न एक मदन । एक रवि एक शशी ॥३६॥ शहा म्हणे बालकांसी । कां न मुजरे करितां मसीं । मी सुभा या देशीं । प्रतिनिधि अलमगिराचा ॥ ३७ ॥ जो जो शहास देती मान । तो त्या भावीं मजलागून । या साठीं आपुली मान । मसीं पाहूनि नम्र करा ॥ ३८ ॥ आम्ही तुम्हां काफरांसी । येवूनि जिंकिलें या देशीं । आपल्या गुलामपणासी । तुम्ही मुलांनो विसरूं नका ॥ ३९ तुम्ही खचित भाग्यहीन । काफराचे उदरीं म्हणोन । जन्म झाला तुम्हांकारण । याचें स्मरण करावें ॥ ४० ॥ जरी पुण्यात्मे तुम्ही असतां । तरी आमुचे पोटां येतां । शीख कुलीं जन्मून लाथा । खाणें आमुच्या भाग तुम्हां ॥ ४१ ॥ गांठीं असल्या अगणित पुण्य । प्राणि होतो मुसलमान । पातकाचें फल पूर्ण । जन्म शीख जातीमध्यें ॥ ४२ ॥ परी पाहूनि तुम्हांप्रति । दया उपजे माझ्या चित्तीं । मुसलमान व्हा शीघ्रगति । सुखसंपत्ति भोगावया ॥४४॥ ऐकून शहाचें भाषण । मुलें कोपलीं दारुण । जेवीं लवांकुश जाण । कर्दळ वनी म्हणतीं मुलें ॥ ४५ ॥ यवन जात खापरखुंटी । आम्ही शीख सुवर्णवाटी । यवन जात करवंटी । उपयोग चुलींत जाळण्याचा ॥ ४६ ॥ नरकांतील कीटकास । नरक वाटे उत्तम खास । तैसाच तुम्हां यवनांस । वाटत आहे चांडाळा ॥ ४७ ॥ तुम्ही अवघे रे वायस । आम्ही दोघे राजहंस । म्हणून उपदेश आम्हांस । करूं नका विष्ठेचा ॥४८॥ हें वीरश्राचें बोलणें । ऐकूनि सुभा कोपला तेणें । करून सेवकां बोलावणें । आज्ञा करी वजीतखान ॥४९॥ या उभगतां करट्यांसी । न्या रे त्वरित

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारास वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठी पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**

"दक्षिणा प्राइस कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश,
विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय
दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणू महाराज ह्यांनी
नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B.
ह्यांनी प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी–भावार्थ दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक
श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ॥४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसानंतर ॥४; बाळकडू:—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ॥८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ॥१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत
घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १॥१० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ॥१४
दीड रत्तल २॥४ ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण–पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.
टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २
पुणें:—श्री साईनाथ आणि कंपनी.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून